दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक १५६ वा रविवार दि.१२ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## तैवान १ लाख भारतीयांना नोकरी देणार



तायपेयी सिटी : तैवान आणि भारत यांच्या मैत्रीत एक नवा अध्याय जोडला जाणार आहे. ब्लूमबर्गच्या रिपोर्टनुसार, तैवान भारतातील सुमारे एक लाख लोकांना नोकरी देणार आहे. हे लोक तैवानच्या फॅक्ट्री, शेतात आणि हॉस्पिटलमध्ये काम करतील. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील महिन्यात म्हणजे डिसेंबरमध्ये या संदर्भात दोन्ही देशांमध्ये करार होऊ शकतो. हा करार झाला तर ही बाब चीनच्या पचनी पडणे कठीण होईल. अलीकडच्या काळात, चीनची अर्थव्यवस्था अनेक आघाड्यांवर संघर्ष करत आहे, तर प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे.तैवानमध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. तेथे कामगारांची नितांत गरज आहे. दुसरीकडे, भारतात लोकसंख्येनुसार नोक–या निर्माण होत नाहीत. २०२५ पर्यंत तैवान एक सुपर एज्ड सोसायटी बनेल असा अंदाज वर्तवण्यात आला. तेथील लोकसंख्येतील वृद्धांची संख्या २० टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. मात्र भारत आणि तैवान यांच्यातील करारामुळे चीनसोबतचा तणाव वाढणार हे नक्की. चीन तैवानला आपला भाग मानतो आणि त्यामुळे दोन्ही देशांमध्ये अनेक वर्षांपासून तणाव आहे. तैवानशी कोणत्याही देशाचे आर्थिक संबंध असावेत असे चीनला वाटत नाही. तर दुसरीकडे चीनचा सीमेवरून भारतासोबत आधीच वाद सुरू आहे.करार अंतिम टप्प्यात : बागची भारत–तैवान यांच्यातील करार अंतिम टप्प्यात असल्याचे भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी गुरुवारी सांगितले. या संदर्भात तैवानच्या कामगार मंत्रालयाने या करारावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. जे आपल्याला सहकार्य करतील आणि लेबर पुरवतील त्यांचे आम्ही स्वागत करतो असे तैवानचे म्हणणे आहे. तैवानला जाऊ इच्छिणा–या भारतातील लोकांचे हेल्थ सर्टिफाईड करण्याच्या यंत्रणेवर काम सुरू असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. तैवानमधील बेरोजगारीचा दर २००० नंतरच्या सर्वात नीचांकी पातळीवर आहे. तैवानची अर्थव्यवस्था ७९० अब्ज डॉलर्सची आहे आणि ती टिकवण्यासाठी देशाला लेबर्सची गरज आहे.

## राममंदिर प्रतिष्ठापनेचे नेत्यांना निमंत्रण नाही



नवी दिल्ली/अयोध्या : अयोध्येत दि. २२ जानेवारी रोजी होणा–या राममंदिराच्या प्रतिष्ठापनेच्या वेळी देशातील कोणतेही मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्यपालांसह कोणत्याही नेत्याला निमंत्रण दिले जाणार नाही. श्री राम मंदिराचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी करतील. अर्थात, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ कार्यक्रमास उपस्थित राहतील. ते आयोजन समितीत आहेत.रा. स्व. संघाचे अ. भा. प्रचारप्रमुख सुनील आंबेकर यांनी अनौपचारिक चर्चेत सांगितले की, राममंदिराच्या प्रतिष्ठापनेसाठी ८००० विशिष्ट लोकांना निमंत्रण पाठविण्यात येईल. यात ४००० साधुसंतांचा समावेश असेल. सरसंघचालक मोहन भागवत या कार्यक्रमात मुख्य अतिथी असणार आहेत. आंबेकर यांनी सांगितले की, संघ व विंहप कार्यकर्ते एक जानेवारी ते १५ जानेवारीपर्यंत देशाच्या प्रत्येक गावात, शहरात राम मंदिराच्या छायाचित्रासह अक्षता घेऊन निमंत्रण देण्यास जाणार आहेत. राममंदिर आंदोलनाशी संबंधित सर्व प्रमुख लोकांना बोलावण्यात येणार आहे. नेत्यांना निमंत्रण न देण्यामागचे कारण सांगताना अंबेकर म्हणाले की, मंदिराचे काम अद्याप पूर्ण नाही. व्हीआयपीच्या येण्याने व्यवस्थेवर ताण पडू शकतो.अयोध्या सजली अयोध्येतील रामजन्मभूमी येथे उभारण्यात येणा–या राममंदिरातील गर्भगृहात दिवाळीनिमित्त झेंडूच्या फुलांच्या हारांची सजावट करण्यात आली आहे. तसेच भगव्या रंगाच्या पताकांनी हा परिसर सुशोभित केला आहे. राममंदिराच्या उभारणीत व्यग्र असलेल्या कामगारांनीही या मंदिरात सजावट करण्यास हातभार लावला. अयोध्येतील शरयू तीरावर लाखो पणत्या उजळून यावेळीही विक्रम करण्यात येणार आहे. त्याची तयारी झाली आहे.काँग्रेसच्या दाव्यावर आरएसएसला नाही आक्षेप अंबेकर म्हणाले की, एक जानेवारीपासून पूर्ण देशात राममय वातावरण तयार होत आहे. ५०० वर्षांच्या लढाईनंतर हा शुभ दिन येत आहे. आता काँग्रेसचे नेतेही दावा करत आहेत की, राममंदिर आमच्यामुळे झाले आहे. राजीव गांधी यांनी त्यावेळी कुलूप उघडले होते. अंबेकर म्हणाले की, संघाला या दाव्याबाबत कोणताही आक्षेप नाही. संघ व विंहपने हा मुद्दा हाती घेऊन निष्कर्षापर्यंत नेला.

## ऑस्ट्रेलियाचा सहज विजय

पुणे : ऑस्ट्रेलियाने वन डे वर्ल्ड कप स्पर्धेतील विजयी मालिका कायम राखताना साखळी फेरीतील अखेरच्या लढतीत बांगलादेशवर दणदणीत विजय मिळवीला. मिचेल मार्शच्या नाबाद १७७ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने ८ विकेट्स राखून हा सामना जिंकला. गुरुवारी त्यांच्यासमोर उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेचे आव्हान असणार आहे. कोलकाताच्या ईडन गार्डनवर ही मॅच होईल.तोवहिद ह्दोयचे अर्धशतक आणि कर्णधार नमजूल होसैन शांतो यांच्या फटकेबाजीने बांगलादेशने तीनशेपार धावा उभ्या केल्या. तनझिज हसन ( ३६), लिटन दास ( ३६) यांनी ११ षटकांत ७६ धावा उभ्या केल्या. नजमूल ४५ धावांवर बाद झाला, तर ह्दोय ७९ चेंडूंत ५ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ७४ धावांवर माघारी परतला. महमुदुल्लाह ( ३२), मुश्फीकर रहिम ( २१) व मेहीदी हसन मिराझ ( २९) यांनी छोटेखानी योगदान दिले. पण, त्यांना अखेरच्या १० षटकांत केवळ ६७ धावाच करता आल्या. बांगलादेशने ५० षटकांत ८ बाद ३०६ धावा केल्या. एबॉट व झम्पा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर ट्रॅव्हीस हेड ( १०) तिस–या षटकात त्रिफळाचीत झाला.डेव्हिड वॉर्नर आणि मिचेल मार्श यांनी १२० धावांची भागीदारी केली. वॉर्नरने ६१ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ५३ धावा केल्या, परंतु या वर्ल्ड कपमध्ये ५०० धावा गाठण्यासाठी त्याला १ धाव कमी पडली. मात्र, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १८००० धावा करणारा तो ख्रिस गेल व सनथ जयसूर्या यांच्यानंतर तिसरा सलामीवीर ठरला. मिचेल मार्शने शतक झळकावून ऑस्ट्रेलियाला विजयाच्या दिशेने कूच करून दिली. मार्शे १३२ चेंडूंत १७ चौकार व ९ षटकारांच्या मदतीने नाबाद १७७ धावा केल्या, तर स्टीव्ह स्मिथने ६४ चेंडूंत ४ चौकार व १ षटकार खेचून नाबाद ६३ धावा केल्या. दोघांनी १३५ चेंडूंत १७५ धावांची भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला ४४.४ षटकांत विजय मिळवून दिला.

## तेलंगणात मागासवर्गीयांसाठी वर्षाला २० हजार कोटींचा निधी



हैदराबाद : तेलंगणात मागासवर्गीय घटकांच्या कल्याण योजनांकरिता दरवर्षी २० हजार कोटी रुपयांचा तर अल्पसंख्याक समाजाच्या विकास योजनांकरिता चार हजार कोटी रुपयांचा निधी राखून ठेवण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले आहे. सत्ता मिळाल्यास सहा महिन्यांच्या आत जातनिहाय गणना करणार असल्याचे त्या पक्षाने म्हटले आहे.निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या आश्वासनात काँग्रेसने म्हटले आहे की, तेलंगणात सरकारी नोक–या, शिक्षणक्षेत्रात मागासवर्गीयांनी तसेच अल्पसंख्याकांना योग्य राखीव जागा देण्यात येतील. अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार युवक व महिलांना एक हजार कोटी रुपयांची कर्जे सवलतीच्या व्याजदरात दिली जातील. इमाम, मुएझिन, खादिम, पाद्री आणि ग्रंथी या धर्मगुरुंना महिना १० ते १२ हजार रुपयांचे मानधन देण्याचे आश्वासनही दिले आहे.भाजपच्या यादीत १४ उमेदवारांचा समावेश तेलंगणामध्ये भाजपने शुक्रवारी उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली असून, त्यात १४ जणांचा समावेश आहे. त्यामध्ये भाजपचे माजी आमदार एन. रामचंद्र राव यांचाही समावेश असून, त्यांना मलकाजगिरी येथून उमेदवारी देण्यात आली आहे. शुक्रवारी जाहीर झालेल्या भाजपच्या अंतिम यादीत ए. श्रीदेवी (बेल्लामपल्ली राखीव मतदारसंघ), दुग्याला प्रदीप (पेड्डापल्ली), रवी कुमार यादव (सेरिलिंगमपल्ली), राहुल चंद्र (नामपल्ली), के महेंद्र आदींचा समावेश आहे.बेघरांना घरासाठी ५ लाखांचे साहाय्य तेलंगणामध्ये शीख अल्पसंख्याक वित्तसाहाय्य महामंडळ स्थापन करण्याचा तसेच उर्दू माध्यमातील शाळांत शिक्षक भरती करण्याचे आश्वासनही काँग्रेसने दिले आहे. अल्पसंख्याक समाजातील बेघर लोकांना जागा देण्याचे व घर बांधण्यासाठी ५ लाख रुपयांचे साहाय्य देण्याची तयारी काँग्रेसने दाखविली आहे. या समाजातील विवाहित जोडप्यांना १ लाख ६० हजार रुपये देण्यात येतील.

## लक्षात ठेवातुम्ही आगीशी खेळत आहात!

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांच्या मंजुरीवरून पंजाब सरकार आणि राज्यपाल यांच्यात सुरू असलेला तिढा गंभीरचिंतेचा विषय आहे, असे सांगत त्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. तुम्ही आगीशी खेळत आहात असेही न्यायालाने म्हटले आहे.भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने पंजाब सरकार आणि राज्यपाल या दोघांना सांगितले की, आपला देश प्रस्थापित परंपरा आणि परंपरांनी चालवला जातो आणि त्यांचे पालन करणे आवश्यक आहे. राज्य विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना संमती न दिल्याबद्दल पंजाबच्या राज्यपालांवर नाराजी व्यक्त करत खंडपीठाने म्हटले की, तुम्ही आगीशी खेळत आहात. विधानसभेचे अधिवेशन असंवैधानिक घोषित करण्याच्या त्यांच्या अधिकारावरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले.विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची बैठक का स्थगित केली,अधिवेशन का पुढे ढकलण्यात आले नाही, असा सवालही खंडपीठाने पंजाब सरकारला केला. विधेयकांना मंजुरी देण्याच्या राज्यपालांच्या अधिकाराच्या मुद्यावर कायदा निश्चित करण्यास एक संक्षिप्त आदेश देण्यात येईल, असेही न्यायालयाने म्हटले. राज्यपाल पुरोहित यांनी राज्य विधानसभेत मंजूर झालेल्या विधेयकांवर केलेल्या कारवाईचा तपशील पटलावर ठेवण्याचे निर्देश दिले.

## गाझा संदर्भात सौदी अरेबियात मुस्लिम देश एकत्र



रियाध : हमास आणि इस्त्राईलमध्ये संघर्ष अजून सुरूच असून या संघर्षाची व्याप्ती अजून वाढण्याची शक्यता आहे. गाझा संदर्भात सौदी अरेबियात मुस्लिम देश एकत्र जमले आहेत. यामध्ये अरब जगतातील आणि मुस्लिम देशांच्या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. या मेळाव्याला ‘इमर्जन्सी समिट’ असे संबोधले जात असून हे सर्व नेते गाझामधील युद्ध संपविण्याचे एकत्रित आवाहन करणार आहेत. यापूर्वी दोन स्वतंत्र कार्यक्रम होणार होते. अरब लीगची परिषद शनिवारी होणार होती आणि इस्लामिक सहकार्य संघटनेची (ओआयसी) बैठक रविवारी होणार होती. या परिषदेची विशेष बाब म्हणजे इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रायसीही यात सहभागी झाले आहेत.इराण आणि सौदी अरेबियाचे हितसंबंध आपसात भिडले आहेत, परंतु मार्चमध्ये दोन्ही देशांनी तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्यात या मुद्यावरून एकमत झाले आहे. रियाधला रवाना होण्यापूर्वी तेहरान विमानतळावर रायसी म्हणाले की, ‘चर्चेची वेळ निघून गेली आहे.’ आता कारवाई करण्याची वेळ आली आहे. मात्र, या परिषदेत असे काही घडू नये यासाठी सौदी अरेबियाचे राज्यकर्ते चिंतेत असल्याचे बोलले जात आहे. असे काही झाल्यास या भागातील तणाव आणखी वाढू शकतो, असे मानले जात आहे.गाझामधील मृत्यू कसे थांबवायचे, सामान्य लोकांचे दु:ख कसे दूर करायचे आणि गाझामध्ये सुरू असलेल्या युद्धाचे प्रादेशिक युद्धात रूपांतर कसे होऊ नये या मुख्य समस्या समस्यांचे चिंतन होणार आहे. दरम्यान, गाझातील पॅलेस्टिनी इस्लामिक जिहाद या संघटनेने या परिषदेचा समाचार घेतला आहे. या संघटनेने विचारले की, युद्धाला ३५ दिवस झाले असताना याला आपत्कालीन परिषद कशी म्हणता येईल? संघटनेने म्हटले आहे की, या संमेलनात शाब्दिक संमेलनापेक्षा अधिक काहीतरी होईल अशी आशा आहे.आयसीयूला लक्ष्य; नागरिकांवर गोळ्या झाडल्या हॉस्पिटलच्या आयसीयूला लक्ष्य करून हॉस्पिटलमधून बाहेर पडणाऱ्या नागरिकांवर गोळ्या झाडल्या गेल्याचे दावे करण्यात येत आहेत. इस्त्राईली लष्कराने (आयडीएफ) यावर म्हटले आहे की, चालू असलेल्या क्रियाकलापांमधून विशिष्ट घटनांची पुष्टी करू शकत नाहीत, परंतु गाझाच्या उत्तर क्षेत्रात हमास विरुद्ध जोरदार लढा चालू आहे. आयडीएफने म्हटले आहे की,संपूर्ण गाझा पट्टीमध्ये हमासविरुद्ध लढा सुरू आहे. सध्या उत्तर भागात हमास विरुद्ध भीषण संघर्ष चालू आहे.काही वेळासाठी लढाई थांबली जबलिया शरणार्थी कॅम्प परिसरात काही वेळासाठी लढाई थांबल्याचे इस्त्रायली लष्कराने म्हटले आहे. जेणेकरून सामान्य लोक येथून दक्षिणेकडे जाऊ शकतील, असे आयडीएफने म्हटले आहे. इस्त्रायली सैन्याने देखील पुष्टी केली आहे की, गाझाकडे जाणारा मुख्य रस्ता शनिवारी स्थानिक वेळेनुसार दुपारी ४ वाजेपर्यंत खुला करण्यात आला होता.

## महुआ मोईत्रांबाबत दिवाळीनंतर होणार निर्णय

नवी दिल्ली : लोकसभेच्या नैतिकता समितीचे अध्यक्ष विनोद कुमार सोनकर यांनी तृणमूल काँग्रेस खासदार महुआ मोईत्रा यांच्यावरील प्रश्न विचारण्यासाठी लाच घेतल्याच्या आरोपावरील समितीचा अहवाल अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या कार्यालयात सादर केला, अशी माहिती शुक्रवारी सूत्रांनी दिली. दिवाळीनंतर बिर्ला त्यावर निर्णय घेण्याची शक्यता आहे.समितीने गुरुवारी झालेल्या बैठकीत, मोईत्रा यांनी संसदेत प्रश्न उपस्थित करण्यासाठी व्यापारी दर्शन हिरानंदानी यांच्याकडून लाच घेतल्याबद्दल मोईत्रा यांची सभागृहातून हकालपट्टी करण्याची शिफारस करणारा अहवाल बहुमताने स्वीकारला होता. समितीने अनैतिक वर्तन आणि सभागृहाचा अवमान केल्याबद्दल मोईत्रा यांची लोकसभेतून हकालपट्टी करण्याची शिफारस केली होती. बिर्ला हे सध्या कोटा येथे आहेत आणि दिवाळीनंतर (१२ नोव्हेंबर) ते नवी दिल्लीत परतण्याची शक्यता आहे. त्यानंतर त्यांनी या अहवालावर कारवाई करणे अपेक्षित आहे.मी परत येईन, दुप्पट मताधिक्य घेऊनहकालपट्टी करण्याची शिफारस केल्याच्या एका दिवसानंतर तृणमूल काँग्रेसचे खासदार महुआ मोईत्रा यांनी शुक्रवारी २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत आपण दुप्पट मताधिक्य मिळवून परत येऊत, असे सांगत एक प्रकारे या प्रकरणामुळे आपल्याला फायदाच होईल, असे सुचवले असे मानले जाते. संसदीय इतिहासात प्रथमच नैतिकता समितीने अनैतिकरीत्या हकालपट्टी केलेली व्यक्ती म्हणून आपली इतिहासात नोंद होईल याचा अभिमान वाटतो. नैतिकता समितीच्या आदेशात हकालपट्टीचा समावेश नाही. प्रथम हकालपट्टीची शिफारस केली आणि नंतर सरकारला सीबीआयला पुरावे शोधण्यास सांगितले, असे मोईत्रा यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# बहुजनांनो, सरकारने आरक्षण ठेवलेच आहे कुठे?

आरक्षणासाठी मोर्चे, आंदोलने आणि आमरण उपोषण होत असताना सरकार मात्र खासगीकरणाचा सपाटा लावत आहे. आज महाराष्ट्रामध्ये आरक्षणाच्या संदर्भात मोठा गदारोळ उठलेला आहे. आंदोलने, आमरण उपोषण करून, निवेदने देऊन आम्हाला आरक्षण मिळालेच पाहिजे अशी भूमिका महाराष्ट्रातील विविध जातीतील माणसे, संघटना घेताना दिसत आहेत. कुणी आम्हाला या गटात टाका म्हणतेय, तर कुणी त्या गटात टाका म्हणतेय. कुणी आम्हाला आरक्षणाचा वाटा मिळत नाही म्हणून आंदोलने करत आहेत, कुणी मोर्चे काढत आहेत, कुणी आमरण उपोषण करत आहेत. आरक्षणावरून एकमेकांच्या विरोधातही अनेकजण उभे ठाकताना दिसत आहेत. जाती - जातींमध्ये, समाजा - समाजांमध्ये, माणसा - माणसांमध्ये, गावा - गावांमध्ये त्याचबरोबर सरकारी कार्यालये, खाजगी कार्यालये, शाळा, महाविद्यालये अशा विविध ठिकाणी आरक्षणावरून विषमता, द्वेषभावना, तिरस्कार मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसत आहे. माणूस माणसापासून तुटत चालला आहे. माणसं एकमेकांच्या विरोधात वागताना बोलताना चालताना दिसत आहेत. त्याचबरोबर समाजमाध्यमांवरही अनेकजण वेगवेगळ्या प्रकारची नको ती वक्तव्ये, विखारी टीका करताना दिसत आहेत. आरक्षणाच्या नावावर सामाजिक, राजकीय क्षेत्रातील माणसे मोठ्या प्रमाणावर राजकारण करताना दिसत आहेत. सर्वसामान्य माणूस अस्वस्थ, अस्थिर आहे, हतबल झाला आहे. काय करावे आणि काय करू नये हे त्याला कळेनासे झाले आहे. अनेकांना अशा या वातावरणात गुदमरल्यासारखे होत आहे. हे वातावरण एकंदरीत महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी घातक आहे.खरे तर या सगळ्या प्रश्नांसाठी ज्यांना आम्ही निवडून दिले आहे, ते लोकप्रतिनिधी आणि सरकारही यावर योग्य तोडगा काढताना दिसत नाहीत. उलट असे भिजत घोंगडे ठेवून त्यावर राजकारण करताना दिसत आहेत. याबाबतची खरी परिस्थिती काय आहे, घटनात्मक बाबी काय आहेत ते सरकारने जनतेसमोर मांडणे गरजेचे आहे. परंतु तसे होताना दिसत नाही म्हणूनच या देशाची परिस्थिती अस्वस्थ, अस्थिर आणि असहिष्णू झाली आहे. एकीकडे आम्हाला आरक्षण मिळायला हवे आहे, कारण आमच्या मुलांना त्याचा फायदा होईल, त्यांचे जीवन चांगले जाईल, अशी भावना आहे, तर दुसरीकडे ज्यांना आरक्षण मिळते आहे त्यांनाही खऱ्या अर्थाने म्हणावा तेवढा या आरक्षणाचा फायदा दिला गेलेला नाही. दलित, आदिवासी, ओबीसी, भटके विमुक्त, पालावरचे असे अनेक जण वंचित आहेत. अनेक महत्त्वाच्या, मोक्याच्या जागा आजही रिकाम्या आहेत. जातीय द्वेषातून त्या जाणूनबुजून भरल्या जात नाहीत. अजूनही आरक्षण मिळणाऱ्या मधल्या काही जाती या आरक्षणापासून कोसो दूर आहेत. त्यांना अजूनही आरक्षणाचा काय फायदा असतो हेही माहीत नाही. अनेकांचे हातावरचे पोट आहे. त्यांच्यापर्यंत आरक्षणाचा उजेड अजून गेलेलाच नाही. त्यातच हे असे वातावरण झाले आहे. जे काही थोडे फार बोटावर मोजण्याइतके आरक्षणामुळे प्रगतीपथावर गेले आहेत त्यांच्याबद्दलही अनेकांच्या मनात असूया निर्माण होताना दिसत आहे. जे आरक्षणामुळे शिकले, सुधारले, प्रगतीपथावर गेले त्यांना समाजामध्ये आजही प्रतिष्ठेपासून दूर ठेवले जाते. त्यांच्या पदोन्नत्या रोखणे, आर्थिक शोषण करणे हे सुरूच आहे. त्यांच्याकडे आजही जातीय भावनेतूनच पाहिले जाते, ही वस्तुस्थिती आहे. हे चित्र असताना, आरक्षणासाठी मोर्चे, आंदोलने आणि आमरण उपोषण होत असताना सरकार मात्र खासगीकरणाचा सपाटा लावत आहे. गेल्या जवळजवळ १५ वर्षांपासून नोकरभरती बंद आहे. आता तर कंत्राटी पद्धत मोठ्या प्रमाणावर येत आहे. अग्निवीर योजना आली आहे. आरक्षणावरही विविध प्रकारच्या माध्यमातून प्रहार होताना दिसत आहेत. दिल्लीत राज्यघटना जाळली जात आहे. विविध प्रकारच्या जाहिरातीतील जागा कोणत्या जातीसाठी आहेत ते अजिबात कळत नाही. त्यामुळे नोकरीची हमी मिळेलच याची शाश्वती नाही. सरकारही याबाबतीत प्रचंड उदासीन आहे. उलट लोकांच्या जीवनात विविध पातळ्यांवर गतिरोधक कसे निर्माण करता येतील याची आखणी मात्र ते सतत करताना दिसत आहेत.आज शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करत आहेत, शिकलेल्यांना नोकऱ्या नाहीत, महागाई प्रचंड वाढली आहे, जातीय धर्मीय तेढ समाजा समाजामध्ये निर्माण होत आहे, शिक्षणाचे खासगीकरण होत आहे, एमपीएससी यूपीएससी सारख्या जागा दारामागून म्हणजे परीक्षेविना भरल्या जात आहेत. अमली पदार्थांचे कारखाने फोफावत आहेत, तरुणाई त्यामध्ये अडकत आहे तरीही या सरकारचे लक्ष नाही. अनेक शिष्यवृत्त्या बंद करणे सुरू आहे. करोना काळात अनेक गरिबांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. कंपन्या बंद पडल्या आहेत. एकंदरीत ही व्यवस्थाच मोडकळीस आणणे सुरू आहे. त्यामुळे संभ्रमावस्था निर्माण होते आहे. अनेक ठिकाणी मुलाखती होतात, पण निवड कोणत्या निकषांवर होते, ते कुणालाही कळत नाही. सगळीकडून असे फासे टाकले जात आहेत. त्यात कटकारस्थान करून बहुजन समाजाला अडकवून टाकले जाते आहे. ज्या आरक्षणासाठी आज लढाया होताना दिसतात त्या आरक्षणाचा उपयोग सद्यस्थितीत काय, हा प्रश्न सर्वसामान्य माणसांनाच नव्हे तर सर्व देशाला पडला पाहिजे. परंतु या प्रश्नाकडे अनेकांचे लक्ष जाऊ नये म्हणून अनेकांना हिंदुत्वात, धर्मात, जातीत अडकवून पद्धतशीरपणे बहुजनांचा काटा काढला जात आहे. राज्यघटनेची मोडतोड केली जात आहे. आज अनेक शाळा बंद पाडल्या जात आहेत. तसे असेल तर शिक्षण आणि नोकरीसाठी आरक्षण कुठे आणि कसे राहणार? कंत्राटी पद्धतीत आरक्षण नाही. बहुजनांची मुले शिकू नयेत म्हणून त्यामध्ये शिक्षक भरती केली जात नाही. नवीन शैक्षणिक धोरणाने तर सर्वसामान्य तरुणांचे जीवन उद्ध्वस्त होणार आहे. तरीही लोकप्रतिनिधीही या संदर्भात काही बोलत नाहीत. ही बाब जनतेने मतदानाच्या वेळी लक्षात ठेवायलाच हवी.आरक्षण धारकांनो जागे व्हा. आपले हक्क, अधिकार कोणी हिरावून घेत आहे का, हे वेळीच ओळखा. अन्यथा येणाऱ्या काळात तुम्हाला राज्यघटनेने माणूस म्हणून दिलेली ओळख पुसली जाऊ शकते. सगळ्याच क्षेत्रातील दरवाजे बहुजनांसाठी बंद करणे सुरू आहे. बहुजनांनाच बहुजनांच्या विरोधात उभे केले जात आहेत. तेव्हा जागे व्हा आणि जागे रहा. जे आरक्षण मिळाले आहे, मिळणार आहे ते वाचवण्याचा प्रयत्न करा.

# सारा खेळ नेट रनरेटचा!

सध्या सुरू असलेली एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा समाप्तीच्या मार्गावर आहे. उपान्त्य फेरीत खेळणारे पहिले चार संघ निश्चित झाले आहेत. भारत १६ गुणांसह पहिल्या, १२ गुणांसह द. आफ्रिका दुसऱ्या तर १२ गुणांसह ऑस्ट्रेलिया तिसऱ्या आणि १० गुणांसह न्यूझिलंड चौथ्या क्रमांकावर आहे. द. आफ्रिका व ऑस्ट्रेलियाचे समान १२ गुण असले तरी सरस नेट रन रेटच्या आधारावर द. आफ्रिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. द. आफ्रिकेचा रन रेट (धावगती) +१.३७ तर कांगारूंचा रन रेट +०.८६१ आहे. भारत, द. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाचा प्रत्येकी एक सामना शिल्लक आहे. न्यूझिलंडचे साखळीतील सर्व नऊ सामने पूर्ण झाले आहेत.मात्र त्याचा नेट रन रेट +०.७४३ असल्याने त्यांचा चौथा क्रमांक निश्चित आहे. त्यांचा चौथा क्रमांक हिसकावून घेण्याची पाकिस्तानला संधी होती परंतु त्यांचा रन रेट +०.०३६ असा कमालीचा कमी असल्याने त्यांना न्यूझिलंडला धक्का देणे केवळ अशक्य आहे. नेट रन रेटच्या समीकरणाचे गणित मोठे मजेशीर आहे. पाकचा इंग्लंडविरुद्धचा सामना शिल्लक आहे. हा सामना पाकने जिंकला तर



त्यांचेही न्यूझिलंडच्या बरोबरीने १० गुण होतील. परंतु त्यांना चौथा क्रमांक मिळणार नाही कारण धावगतीत ते मार खातात. किवीजची धावगती मागे टाकायची असेल तर पाकने प्रथम फलंदाजी केल्यास इंग्लंडला २८७ धावांनी पराभूत करावे लागेल. अथवा इंग्लंडने प्रथम फलंदाजी केल्यास त्यांनी दिलेले लक्ष्य पाकला अवघ्या १६ चेंडूत पार करावे लागेल. म्हणजे समजा इंग्लंड संघ १५० धावांत गारद झाला तर पाकला १५१ धावा केवळ १६ चेंडूत काढाव्या लागतील. म्हणजेच पाक संघ ९९.९९ टक्के स्पर्धेतून बाद झाला आहे. आता त्यांना इंग्लंडविरुद्धचा शेवटचा सामना खेळण्यासाठी चंबूगबाळ आवरूनच मैदानात उतरावे लागेल.बाद फेरी गाठण्यासाठी दुसऱ्या संघावर विसंबून राहिले की असेच होणार! चौथा क्रमांक निश्चित करण्यासाठी न्यूझिलंडने श्रीलंकेला पराभूत करणे 'मस्ट' होते. किवीज्ने ते सहज साध्य केले. बोल्टने ३ बळी घेत श्रीलंकेला १७१ धावांत गुंडाळले आणि विजयी लक्ष्य २३.२ षटकांत गाठले. श्रीलंका पराभूत झाल्याने पाकिस्तान आणि अफगाणिस्तानची गोची झाली. गुणतालिकेत श्रीलंका नवव्या क्रमांकावर आहे. श्रीलंकेने पराभूत होताना पाक आणि अफगाणला जणू काही असे बजावले की 'हम तो डूबे है सनम, तुमको भी ले डूबेंगे'! बाद फेरीत मात्र नेट रन रेटचे महत्त्व उरणार नाही!. जो हार गया, वो मर गया!

# आयुर्वेदाचे चिकित्सा क्षेत्रातील स्थान काय?

कोणत्याही चिकित्सापद्धतीला उदय आणि विकासाच्या चार टप्प्यांतून जावे लागते. निरीक्षण, अनुभव, ज्ञान आणि तंत्रज्ञान. आयुर्वेद निरीक्षण आणि अनुभव या दोन टप्प्यांतच बंदिस्त राहिलं. – श्रीपाद जोशी लोपॅथी श्रेष्ठ की आयुर्वेद, आयुर्वेदिक डॉक्टरांनी लोपॅथीची औषधं देणं योग्य की अयोग्य हे वाद नेहमीच सुरू असतात, मात्र आयुर्वेद हे प्राचीन आहे. त्याला काही मर्यादा आहेत. त्या कोणत्या, आयुर्वेदाच्या क्षेत्रात संशोधनाच्या शक्यता किती, ते आजच्या काळात व्यवहार्य आहे का या प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे. कुठलीही चिकित्सापद्धती उदयाला येऊन विकसित होण्याच्या प्रवासात वैद्यकीय माहितीचे चार टप्पे पडतात. जेव्हा माणूस नुकताच जंगलातून, गुफांतून बाहेर पडून शेतीभाती करू लागला होता, तेव्हा त्याने आजुबाजूच्या परिसराचं आणि निसर्गातील घटनांचं निरीक्षण सुरू केलं होतं, हा पहिला टप्पा होता निरीक्षणाचा. वारंवार निरीक्षणं करून त्याला काही गोष्टी एकसारख्या घडतात हे कळलं, हा झाला दुसरा टप्पा अनुभवाचा. त्याने अनुभवांवर आधारित काही प्रयोग करून बघितलेत आणि त्यात त्याला आढळलेले निष्कर्ष म्हणजे तिसरा टप्पा ज्ञानाचा. आणि चौथा म्हणजे पायाभूत विज्ञानाचा विकास झाल्यावर त्यावर आधारित तंत्रज्ञानाचा रोगनिदान आणि उपचार दोहोंमध्ये कौशल्यपूर्ण वापर करणे, हा झाला चौथा टप्पा तंत्रज्ञान आणि कौशल्याचा. आयुर्वेदाला निरीक्षण आणि अनुभव या दोन टप्प्यांतच बंदिस्त होऊन रहावं लागलं. आधुनिक वैद्यकाला आयुर्वेदापेक्षा पायाभूत विज्ञान तंत्रज्ञानाची साथ अधिक मिळाली, तसंच आधुनिक वैद्यकाचं ज्ञानाधारित स्वरूप रोगनिदानाच्या क्षेत्रात क्रांती करून गेलं. इथून पुढचं युग केवळ आधुनिक वैद्यकाचंच असणार आहे. निरीक्षण आणि अनुभवांवर आधारित असल्यामुळे आयुर्वेदातील काही गोष्टी खऱ्या असल्याचा भास होतो कधीमधी आणि आधुनिक ज्ञानाचं सोयिस्कर पाठबळ घेऊन आयुर्वेदातले काही काल्पनिक सिद्धांत खरे ठरवण्याचे प्रयत्न अभिनिवेशी आयुर्वेद समर्थकांकडून होत असतात. पण उधारीत मागून आणलेले कपडे कधीच अंगानेटके बसत नसतात, तसंच आयुर्वेदात आधुनिक ज्ञानाचं पाठबळ घेण्याचा प्रयत्न अपुरा पडतो.आपल्या पूर्वजांकडे तीव्र निरीक्षण बुद्धी होती. त्यांच्या अवतीभवती चालणाऱ्या सृष्टीक्रमाचं सूक्ष्म निरीक्षण ते करत गेले. अनेक निरीक्षणांमधून त्यांना ज्या सृष्टीक्रमांचं सातत्य जाणवलं, त्यांचं स्पष्टीकरण शोधायला त्यांनी काही सिद्धांत मांडले. सिद्धांत मांडून झाल्यावर, त्या सिद्धांतांची यथार्थता तपासण्यासाठी काही प्रयोग करून बघितले आणि प्रयोगाअंती जे सिद्धांत प्रत्यक्षाच्या कसावर खरे उतरले त्याला शास्त्राचं रूप आलं.आयुर्वेदाचे सिद्धांतदेखील याच प्रकारे, सतत निरीक्षणाअंती मांडले गेले आहेत. आयुर्वेदात सुश्रुताने मानवी शरीररचनेच्या अभ्यासाचा पाया घातला आहे. पण त्याची शरीर विच्छेदनाची पद्धत, त्याच्या काळात सूक्ष्मदर्शक उपलब्ध नसल्याची मर्यादा या बाबींमुळे आयुर्वेदाच्या शरीर रचनेच्या अभ्यासावर फारच मर्यादा आल्या. शरीररचना व्यवस्थित न कळल्यामुळे शरीर क्रियेच्या माहितीवरदेखील आपसुकच मर्यादा आल्या. आजारपण म्हणजे मानवी शरिराची रचना आणि क्रिया या दोहोंपैकी एकात किंवा दोन्हींमध्ये आलेली विकृती असते, हे मुलभूत तत्त्वच आयुर्वेद ओळखू शकला नाही.आयुर्वेदाचा अभ्यास करणाऱ्या पूर्वजांना मानवी शरीराचे क्रियाव्यापार समजण्यासाठी सिद्धांत मांडावे लागले होते. क्रिया विकृत झाली की आजार होणार म्हणून आजारांच्या विकृतीचा विचार करताना, सिद्धांत ओघानेच येणार आणि मग वनस्पती औषधी घेऊन आजार बरा होणार याचा अर्थ औषधींनी क्रियाविकृती दूर होणार. त्यामुळे वनस्पतींचे काम शरीरात नेमके कशावर होते हे सांगण्यासाठीही सिद्धांत आवश्यकच होते.सिद्धांत मांडणीचा पाया एखादी गोष्ट प्रत्यक्षात वारंवार घडताना बघणं हा असावा लागतो. वारा, सूर्य आणि चंद्राला बघून शरीर क्रिया, रोगनिर्मिती आणि वनौषधींचा रोगलक्षणांवर होणारा परिणाम या निरीक्षणांचं स्पष्टीकरण देण्यासाठी आयुर्वेदाने त्रिदोष सिद्धांत वापरला आहे.वात, पित्त, कफ हे तीन दोष आयुर्वेदाने मानले आहेत. या पैकी वाताचे चरकाने तर पित्त आणि कफाचे सुश्रुताने पाच पाच प्रकार करून त्यांची नावं आणि शरीरातील कामं सांगितली आहेत. सुश्रुताने कफ दोषाचे पाच प्रकार मानून त्यांचे शरीरातील काम सांगितले असले तरीही त्यांची नावं मात्र वाग्भटांनी दिली आहेत.कफ दोषाच्या पाच प्रकारांपैकी तर्पक, बोधक आणि श्लेषक हे तीन वगळता क्लेदक आणि अवलंबक कफ, वाताचे प्राण उदान व्यान समान अपान आणि पित्ताचे साधक, भ्राजक, रंजक, आलोचक आणि पाचक पित्त शरीरात प्रत्यक्ष दाखवता येणे अवघड आहे. क्वचित 'सिडिटी झाल्यावर उलटीतून पडणारं आंबट कडू पाणी पित्त म्हणून बोलीभाषेत सांगितलं जातं.ग्रंथांनी वर्णन केलेली रोगलक्षणं ही प्रत्यक्ष आहेत, तसेच वनस्पतींचा रोगलक्षणांवर दिसणारा परिणामसुद्धा. आयुर्वेदाने मानलेले सात धातू रस, रक्त मांस, मेद, अस्थि, मज्ञा शुक्र, तीन मल, स्वेद, मूत्र आणि पुरीष (विष्ठा) तसेच उपधातू, स्तन्य, आर्तव इ. हे शरीरात प्रत्यक्ष उपस्थित असणारे घटक आहेत.आयुर्वेदाने वापरलेल्या औषधींपैकी काहींचे ग्रंथांनी सांगितलेल्या लक्षणांमध्ये परिणाम दिसतात, हे वास्तव आहे. परंतु त्या लक्षणांच्या उद्भवण्याची आणि पर्यायाने त्यावरच्या वनौषधींच्या होणाऱ्या परिणामांची कारणमीमांसादेखील त्रिदोषांच्या सैद्धांतिक पातळीवरच मांडली जाते. हे सिद्धांत म्हणजे आयुर्वेदाचा पाया म्हणा किंवा आत्मा आहेत. आयुर्वेद भारतीय उपखंडात विकसित झालेली सुमारे अडीच तीन हजार वर्षं जुनी पद्धत आहे. ती तत्कालीन भूप्रदेशातील कृषिआधारीत जीवनपद्धतीशी निगडीत आहे. त्याला तत्कालीन साधनसंपदेच्या मर्यादेमुळे एक विशीष्ट पायामांडणी स्वीकारावी लागली आहे. थोडक्यात, आयुर्वेद एका अतिविशाल परंतु मर्यादीत भूभागातील एका संस्कृती/ जीवनपद्धतीचं, त्या काळाशी सुसंगत असं उपचारांचं शास्त्र आहे. आयुर्वेदाची भाषा, पारिभाषिक शब्दावलीसुद्धा विशिष्ट भूकेंद्रित अर्थातच संस्कृत आहे.आयुर्वेद आकाराला येऊ लागला होता, तोवर पायाभूत विज्ञानाचा जसे भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र यांचा जन्मही झाला नव्हता. त्यामुळे आयुर्वेदात पायाभूत विज्ञानाशी निगडीत बाबी दिसत नाहीत. पायाभूत विज्ञानाचा विकास पाश्चात्य जगतात अधिक झाल्यामुळे त्या विज्ञानाची आणि त्यातून निर्माण झालेल्या तंत्रज्ञानाची भाषा वेगळी झाली आणि सध्या ती इंग्रजी आहे. आयुर्वेदाचे पायाभूत संदर्भ ग्रंथ जसे चरक, सुश्रुतादी संहिता या संस्कृतमधून लिहिलेल्या असल्यामुळे आयुर्वेद शिक्षणाची भाषा संस्कृत असणं अपरिहार्य आहे. आधुनिक वैद्यकाचा नेत्रदीपक विकास का झाला? कारण त्यांनी पायाभूत विज्ञानातील आणि तदाधारित तंत्रज्ञानाच्या विकासाचा पुरेपुर वापर करून घेतलाय म्हणून. मात्र आधुनिक वैद्यकाचा विकास रोगलक्षणांचा आणि विकृतीविज्ञानाचा एका मर्यादेपर्यंतचा अभ्यास वगळता, क्लिनिकल प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांनी केलेला नसून, वैद्यकेतर विषयातील वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी आणि तंत्रज्ञांनी घडवून आणला आहे. डॉक्टर्स त्या विकासाचा वापर तेवढा करून घेत आहेत. आता आयुर्वेदात संशोधन व्हायला हवं म्हणून फार बोललं जातं. आयुर्वेदात विकास कुठे कुठे व्हायला हवा याची आधी जाणीव असायला हवी. आयुर्वेदाने जेवढी म्हणून प्रत्यक्ष शरीररचना सांगितली त्या रचनेचा आयुर्वेदिक रोगनिदानात फार काही उपयोग करून घेतलेला नाही. शिवाय ती अत्यंत आदीम आणि प्राथमिक स्तरावरची शरीर रचना आहे.शरीर क्रिया पूर्णपणे सैद्धांतीक आणि अत्यंत तोकडी आहे. प्रत्यक्षात घडणाऱ्या शरिरक्रियेचादेखील आयुर्वेदिक विकृतीविज्ञानाशी काहीही संबंध नाही. परिणामी रोगांचे कारक त्रिदोष मानले आहेत, त्यामुळे रोगजंतूंमुळे काही रोग होतात हेच माहिती नाही. त्रिदोषांव्यतिरिक्त इतरही बाह्य कारणांमुळे आजार उद्भवू शकतात असा थोडाफार अंदाज चरक सुश्रुतांना आला असावा, असं संहितांमधील वर्णन वाचून जाणवतं, पण त्या दिशेने ठोस असा काही विचार आयुर्वेदात झालेला दिसत नाही. त्यामुळे आयुर्वेदात रोगांच्या बाबतीत किमान तीन पातळ्यांवर बदल व्हायला हवा आहे. सर्वांत प्रथम रचना आणि क्रिया तसेच विकृतीविज्ञान आणि सूक्ष्मजीवशास्त्र यांचा अभ्यास आयुर्वेदात व्हायला हवा. मात्र हा अभ्यास केल्यास आयुर्वेदाचा डोलारा ज्या पायावर उभा आहे- त्रिदोष सिद्धांत- त्यालाच बाधा पोहोचते. आता आधुनिक वैद्यकाप्रमाणे आयुर्वेदातही रोगनिदानाच्या आधुनीक पद्धती वापराव्यात, अशी अपेक्षा ठेवली जाते. विशेषतः मिश्र उपचार करणारे आयुर्वेदिक पदवी आणि पदव्युत्तर पदवीधारक हिरीरीने हा विचार मांडतात. आयुर्वेदिक सभा संमेलनांतील वक्ते आधुनिक विज्ञान ही काही आधुनिक वैद्यकाची मक्तेदारी नाही, आयुर्वेदीकांनीही त्याचा वापर करून घ्यावा, असे वक्तव्य करून टाळ्या मिळवतात. पण ही सगळी मंडळी एका गोष्टीकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असतात, ती म्हणजे, कोणत्या आजारात कोणत्या तपासण्या करायच्या, त्यांचे निष्कर्ष काढण्याची पद्धत, बायोकेमेस्ट्री, मायक्रोबायॉलॉजी, इमेजिंग टेक्निक्स यासाठी शरीररचना आणि रेडियोलॉजीचं ज्ञान असणं अत्यंत आवश्यक असतं. विज्ञान आणि तंत्रज्ञानांच्या फायद्यांवर सर्वांचा अधिकार असतो मात्र विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातीले प्रशिक्षित तज्ज्ञच आवश्यक असतात हे आयुर्वेदिक लोकांनी लक्षात घ्यायला हवं. रोगनिदानाच्या आधुनिक तंत्राचा उपयोग घ्यायचा असेल तर आयुर्वेदीकांना रचना, क्रिया, विकृतीविज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र आणि जीवरसायनशास्त्र, रेडियोलॉजी शिकायलाच हवी.म्हणजे आयुर्वेदात किमान रचना, क्रिया, विकृतीविज्ञान, सुक्ष्मजीवशास्त्र आणि जीवरसायनशास्त्र आणि रेडियॉलॉजी एवढे विषय नव्याने शिकावे लागतील. मात्र या सर्व क्षेत्रात आधुनिक वैद्यकाने आधीच गगनभरारी मारून ठेवली आहे. त्यामुळे याक्षेत्रात संशोधनासाठी आयुर्वेदीकांना काही वाव उरलेला नाही. याउलट, इथे संशोधनाचे प्रयत्न करणे म्हणजे वेळ, पैसा, परिश्रम आणि मानवी संसाधन वाया घालवण्यासारखं होईल.याशिवाय आयुर्वेदाला माहिती नसलेली असंख्य रोगलक्षणं आहेत. त्या रोगलक्षणांची कारणं, त्यामागचं विकृती विज्ञान, त्याचं रोगनिदान करणं हे सगळं आयुर्वेदाला माहीत करून घ्यावं लागेल. मात्र इथेही आधुनिकांनी आधीच फार लांबचा पल्ला गाठला आहे. इथेसुद्धा आयुर्वेदिकांना फारसा वाव उरलेला नाही.रहाता राहिलं ते आयुर्वेदिक औषधींचे रोगलक्षणांवर दिसणारे परिणाम. त्यात दोन भाग पडतात. वनौषधींचे घटक माहिती करून घेणं आणि त्यांची शरीरात होणारी क्रिया तपासणं आणि दुसरा त्या वनौषधींचे तसेच खनिज आणि धातू, रत्न उपरत्न, विषं इत्यादींचे ग्रंथोक्त तसेच ग्रंथात माहिती नसलेल्या रोगलक्षणांवर होणारे परिमाण तपासून निश्चित करणं.यातला पहिला भाग, घटक निश्चिती आणि शरीरातील क्रिया तपासणं हा फार्माकॉलॉजीच्या अभ्यासाचा आहे आणि तो अभ्यास करता यावा असं शिक्षण आयुर्वेदिकांना दिलंही जात नाही. उरतो दुसरा भाग, ग्रंथोक्त रोगांवर त्यांचे परिणाम तपासणं. आयुर्वेदाचे आजार हे खरे तर रोगलक्षणं आहेत. उदा. कावीळ हा आयुर्वेदाने आजार मानला आहे आणि त्याची चिकित्सा सांगितली आहे. मात्र आधुनिक वैद्यकात कावीळ हे रोगलक्षण आहे आणि त्याची कारणं रक्ताचे आजार, यकृताचे आजार किंवा पित्त वाहून नेणाऱ्या नळीतील अडथळा अशी वेगवेगळी असू शकतात. आयुर्वेदिक ग्रंथात असलेलं कावीळचं औषध नेमकं कोणत्या कारणामुळे उद्भवलेल्या कावीळवर काम करत हे ठरवायचं झालं, तर प्रथम काविळचं रोगनिदान नक्की करावं लागेल. आणि ते रोगनिदान नक्की करण्यासाठी आपल्याला सध्या तरी आधुनिक वैद्यक तज्ञांची मदत घ्यावी लागेल (सध्याच्या आयुर्वेदिकांना आधुनिक रोगनिदानाचं पायाभूत शिक्षण मिळून ते त्यातले तज्ज्ञ होण्यास अजून बराच वेळ लागणार आहे) उपचार करायला आयुर्वेदीक प्रॅक्टिशनर लागेल. मात्र रोगलक्षणात औषधींचा होणारा परिणाम तपासायला आधुनिक प्रॅक्टीशनरच असायला हवा.आयुर्वेदातील काही लोकांना संशोधनाचं आधुनिक वैद्यकातलं प्रारूप मान्य नसतं. त्यांचं म्हणणं असतं की आयुर्वेदाचं संशोधन आयुर्वेदाच्या पद्धतींनी व्हायला हवं. परंतु त्यापद्धती कोणत्या असाव्यात किंवा कशा विकसित करायला हव्या या दिशेने त्यांच्याकडून फारसा काही प्रयत्न झाल्याचं दिसतच नाही.मुळात अडचण ही आहे की आयुर्वेदिकांचा बारावी सायन्सनंतर पायाभूत विज्ञान, त्याची परिभाषावली, त्यांचे उपायोजन (रश्रिळलरिंळेप) आणि त्यांची भाषा याबाबींशी काहीही संबंध उरत नाही. मग आधुनिक विज्ञानाला मान्य असलेल्या संशोधनाच्या रितीभाती आयुर्वेदिकांना माहिती पडतीलच कशा?आयुर्वेदाचं आयुर्वेदिक स्वरूप टिकवायचं झालं तर त्रिदोष सिद्धांत मान्य करावाच लागतो. रोग होण्याचं कारण त्रिदोष असतात हे नाकारलं तर आयुर्वेदाचं आधुनिक वैद्यकात रुपांतर अटळ होतं. आणि त्रिदोषांचं शरीरात अस्तित्व तुम्ही एक तर मान्य करू शकता किंवा अमान्य एवढाच एक मार्ग उपलब्ध आहे. कारण अद्यापतरी कुठलीही रक्ताची चाचणी त्रिदोषांचं शरीरातील अस्तित्व सिद्ध करू शकत नाही, ना एखाद्या इमेजिंग टेक्निकमध्ये त्रिदोष दिसू शकतात आणि ते अस्तित्वात नाहीत, हे आयुर्वेदिकांना मान्य होण्यासारखं नाही.आयुर्वेदाच्या अभ्यासाची भाषा वेगळी आहे, अभ्यासाच्या विषयाचा सध्या सर्वमान्य विषयांशी फारसा संबंध नाही. त्या सर्वमान्य विषयांच्या अध्ययन आणि संशोधनपद्धतींशी जुळवून घेण्याची आयुर्वेदिकांची फारशी इच्छाही नाही. तसंच त्यांना त्या पद्धतींशी जुळवून घेण्यासाठी लागणारी निर्णयक्षमता, त्यांनी ते तसं जुळवून घेण्यासाठी लागणारी राजमान्यता आणि त्यासाठी लागणारा निधी सगळ्या गोष्टींची वानवा आहे.क्लिनीकल प्रॅक्टीशनरचं काम इतरांनी केलेल्या संशोधनाचं रुग्णाच्या उपचारात उपायोजन करणं इतकंच असतं, संशोधन करणं नव्हे हे विसरून सगळे जण आयुर्वेदीक प्रॅक्टीशनरकडून आयुर्वेदातील संशोधनाची अपेक्षा करतात, हे पाण्यात रहाणाऱ्या माशाला हवेत उडण्याचं संशोधन करायला लावण्यासारखं अमानवी आहे.आयुर्वेदाने वापरलेल्या वनौषधींमधील, आयुर्वेदाला ज्या आजाराचं रोगनिदान करता येणार नाही, अशा आजारावर परिणामकारक तत्त्वं, अनायुर्वेदीक मंडळी शोधून काढतात आणि आयुर्वेदिकांचं त्यात काही योगदान असू शकत नाही याचं कारण वर उल्लेख केलेल्या बाबींमध्ये कुठे आढळतं का याचा विचार करायला हवा.

आयुर्वेदिक ग्रंथातील वर्णनाचे मुख्य दोनच वर्ग आहेत १) निरीक्षण आणि आनुभविक क्लिनीकल वर्णनं २) काल्पनिक सिद्धांत

निरीक्षण आणि क्लिनिकल अनुभवांचं शरीर रचना आणि क्रियेच्या स्तरावर स्पष्टीकरण देता येण्याजोगा मानवी शरीराच्या रचनेचा आणि क्रियेचा अभ्यास तेव्हा आयुर्वेदाला झाला नव्हता, म्हणून त्यांना त्यांचे तत्कालीन निरीक्षण आणि क्लिनिकल अनुभवांचं स्पष्टीकरण देण्यासाठी त्रिदोषादी सिद्धांत मांडावे लागलेत.आयुर्वेदात आता थोडा फार उपयुक्त भाग काही उरला असेल तर तो निरीक्षण आणि आनुभविक क्लिनिकल वर्णनाचाच आहे, तोदेखील फार अधिक नाही. सिद्धांत सगळेच्या सगळे कालबाह्य झाले आहेत. हे लक्षात घेऊन आयुर्वेदाचं आजच्या चिकित्सा क्षेत्रातील स्थान निश्चित करावं लागेल.

# भांडी घासू नका फक्त धुवा; कोणत्याही कष्टाशिवाय भांड्यावरचे तेलकट डाग घालवण्याचा सोप्पा फॉर्म्युला




दिवाळीच्या आधीच महिलावर्गाने साफसफाई केली असेल. भांडी-कुंडी स्वच्छ लखलखीत करून ठेवली असतील. पण असं प्रत्येकालाच जमत नाही. काही वर्किंग वुमन्स तर दिवाळीच्या आधल्या दिवशी सफाईला हात लावतात.तुम्हीही अगदी शेवटच्या दिवशी सफाई करत असाल तर वेळ, पैसा वाचवणारी एक ट्रिक तुम्हाला सांगतो. तुम्ही मोठे-मोठे स्टीलचे डबे स्वच्छ करणार असाल तर त्यावर जास्त मेहनत न घेता डबे लखलखीत कसे करायचे हे पाहुयात.डबे अन् त्यांची झाकणं, मोठ्या कढया साफ करायला त्या तासंतास घासत बसावं लागतं. भांडी घासून हातही बोथट होतात. त्यामुळे तुम्हालाही हातांची काळजी घ्यायची असेल. तर, ही एक ट्रिक नक्की करून बघा.साहीत्य - पाणी, सोडा, लिंबू आणि वॉशिंग पावडर एका मोठ्या टबमध्ये संपूर्ण डबा बुडेल इतके पाणी घ्या. आता या पाण्यात एक लिंबू, १ चमचा सोडा अन् वॉशिंग पावडर टाका. आता या पाण्याचा हातानेच फेस बनवा.त्यानंतर एक एक डबा या पाण्यात बुडवा आणि त्यावर फक्त कापड फिरवा. जसे तुम्ही कापड फिरवाल तसे भांड्यांचे डाग निघून जातील.छोटी भांडी असतील तर अशा पाण्यात टाकून ठेवा आणि थोड्यावेळाने फक्त धुवून घ्या. म्हणजे ती लख्ख निघलेली दिसतील.

# इंग्लंडचे पाकसमोर ३३८ धावांचे आव्हान

कोलकाता : पाकिस्तान संघाचा वर्ल्ड कप स्पर्धेतील प्रवास साखळी फेरीतच संपुष्टात आला. इंग्लंडविरुद्धच्या आज अखेरच्या साखळी सामन्यात पाकिस्तानच्या गोलंदाजांनी पुन्हा माती खाल्ली हॅरीस रौफच्या धुलाईचे सत्र याही सामन्यात कायम राहिले. बेन स्टोक्स व जो रूट यांच्या वैयक्तित अर्धशतकाने पाकिस्तानचा चांगला चोप दिला. इंग्लंडकडून वन डे वर्ल्ड कप स्पर्धा इतिहासात १००० धावा करणारा रूट पहिला फलंदाज ठरला.बाबर आजमच्या सकारात्मकतेच्या पाकिस्तानी गोलंदाजांनीचिंधड्या उडवल्या. डेवीड मलान व जॉनी बेअरस्टो यांनी ८२ धावांची भागीदारी केली. मलान ३१ धावांवर बाद झाला. एकाच वर्ल्ड कपमध्ये ५०० हून अधिक धावा देणारा तो आशियातील पहिला गोलंदाज ठरला. बेअरस्टोने अर्धशतक पूर्ण केले. बेअरस्टोने ६१ चेंडूत ५९ धावा केल्या. रौफला त्याची विकेट मिळविण्यात यश आले. जो रूट व बेन स्टोक्स यांनी तिस-या विकेटसाठी १३१ चेंडूत १३२ धावांची भागीदारी केली. मागील सामन्यातील शतकवीर स्टोक्सने आज ७६ चेंडूत ११ चौकार व २ षटकारांसह ८४ धावा चोपल्या. शाहीन आफ्रिदीने त्याचा त्रिफळा उडवला.जो रूटही ७२ चेंडूत ६० धावांवर शाहीनच्या गोलंदाजीवर बाद झाला. वर्ल्ड कप स्पर्धा इतिहासात १००० धावा करणारा जो रूट हा इंग्लंडचा पहिला फलंदाज ठरला. ग्रॅहम गूच ( ८९७) व बेन स्टोक्स ( ७६५) यांनी त्यानंतर इंग्लंडसाठी वर्ल्ड कपमध्ये सर्वाधिक धावा केल्या आहेत. वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानकडून सर्वाधिक विकेट्स घेणा-या गोलंदाजांत शाहीन ( ३४) संयुक्तपणे ( इम्रान खान ) तिस-या क्रमांकावर आला. वसीम अक्रम ( ५५) व वाहब रियाझ ( ३५) हे आघाडीवर आहेत. जॉस बटलर आणि हॅरी ब्रुक यांनी २६ चेंडूत ४२ धावांची भागीदारी केली. ब्रुकने १७ चेंडूत ३० धावा कुटल्या. बटलर १७ चेंडूत २७ धावांवर रन आऊट झाला. इंग्लंडने ५० षटकांत ९ बाद ३३७ धावा केल्या.


# केसांवर ब्लो ड्राय करताना ‘या’ गोष्टींची काळजी घ्यायला विसरू नका

आजकाल केसांच्या विविध प्रकारच्या स्टाईल करण्यावर महिलांचा भर आहे. हेअर स्ट्रेटनिंग, हेअर कॅरेटिन, हेअर स्मूथनिंग इत्यादी प्रकारच्या स्टाईल्स केसांवर केल्या जातात. केस ब्लो ड्राय करण्याकडे ही तरूणींचा आणि महिलांचा कल आहे.केस ब्लो ड्राय केल्यामुळे केस सरळ होतात आणि केसांना छान चमक येते. मात्र, अनेकदा केस ब्लो ड्राय करताना काही चूका केल्या जातात. ज्या चुकांमुळे केस आणखी खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे, केस ब्लो ड्राय करताना काही गोष्टींची खास काळजी घेणे महत्वाचे आहे. केस ब्लो ड्राय करताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायची? ते आज आपण जाणून घेऊयात.ओल्या केसांमध्ये करू नका ब्लो ड्राय ओल्या केसांमध्ये ब्लो ड्राय करणे हे चुकीचे आहे. जर तुम्ही असे करत असाल तर असे करणे टाळा. तुमचे केस कोरडे झाल्यानंतरच त्यावर ब्लो ड्राय करा. सर्वात आधी केस कोरडे करून घ्या त्यानंतर केस विंचरताना ब्लो ड्राय करा. कोरड्या केसांमध्ये ब्लो ड्राय केल्यावर केसांचे नुकसान होत नाही.टाळूजवळ करू नका ब्लो ड्राय ब्लो ड्रायरमधून बाहेर पडणारी गरम हवा ही स्काल्प अर्थात तुमच्या टाळूला इजा पोहचवू शकते. तुम्ही किती ही घाईमध्ये असला तरी सुद्धा चुकूनही टाळूजवळ ब्लो ड्राय करू नका. ब्लो ड्राय केसांना करा, मात्र, चुकूनही टाळूजवळ




ब्लो ड्राय करू नका.गरजेपेक्षा जास्त केस सुकवू नका केसांवर गरजेपेक्षा जास्त ब्लो ड्राय करणे टाळा. जास्त प्रमाणात केस कोरडे केल्यावर केस फ्रिझी होण्याचा धोका असतो. त्यासोबतच, केस निस्तेज दिसू लागतात. परिणामी, केसांची चमक निघून जाते. त्यामुळे, गरजेपेक्षा जास्त प्रमाणात केस सुकवू नका.

# ऑनलाइन रमी आणि पोकर सुरुच राहणार




चेन्नई : मद्रास उच्च न्यायालयाने ऑनलाइन रमी आणि पोकर प्रतिबंध कायदा असंवैधानिक असल्याचा निर्णय दिला आहे. ई-गेमिंग फेडरेशन (ईजीएफ) चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुराग सक्सेना यांनी उच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.तामिळनाडू सरकारने ऑनलाइन गेमवर घातलेल्या बंदीविरोधात ऑनलाइन गेमिंग कंपन्यांनी दाखल केलेल्या प्रकरणांची सुनावणी करताना मद्रास उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. सप्टेंबर २०२३ मध्ये सुनावणी संपल्यानंतर या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली. ९ नोव्हेंबर रोजी या प्रकरणाचा निकाल देण्यात आला. तामिळनाडू सरकारने यापूर्वी म्हटले होते की, ऑनलाइन कंपन्यांच्या जाहिरातींमुळे आकर्षित होऊन अनेक तरुणांनी कर्ज घेतले आणि हा खेळ खेळला आणि ते हरले.पैसे न भरल्याने आतापर्यंत ३० हून अधिक जणांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे ऑनलाइन गेमवर बंदी घालणारा तामिळनाडू सरकारचा कायदा कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर ठरणार नाही. असोसिएशन ऑफ ऑनलाइन गेमिंग कंपन्यांच्या मते, कौशल्य-आधारित गेम जुगार नाही. पैज लावून खेळला जाणारा कौशल्याचा खेळ जुगार मानला जाऊ शकत नाही. ऑनलाइन गेमसाठी, कायद्यानुसार एक नियामक संस्था तयार केली जाईल. ऑनलाइन गेमिंग कंपन्यांच्या संगनमताने कठोर नियमांचे पालन केले जाते, असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

# सिंकदर शेख यंदाचा महाराष्ट्र केसरी, शिवराज राक्षेला केले चितपट

पुणे : यावर्षीचा महाराष्ट्र केसरीचा मान पैलवान सिंकदर शेखने पटकावला आहे. गतवर्षीचा महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षेला चितपट करत सिकंदर शेख यंदाचा महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला आहे. मानाची चांदीची गदा देत सिकंदर शेखचा सन्मान करण्यात आला. प्रदीपदादा कंद आणि पुणे जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र केसरी स्पर्धेचं आयोजन केले होते. या स्पर्धेत सिंकदर शेख विजयी झाला आहे.पुणे जिल्ह्यातील फुलगाव इथं महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा सुरु होती. या स्पर्धेतील अखेरची लढत सिंकदर शेख आणि शिवराज राक्षे यांच्यात झाली. यामध्ये सिंकदर शेखने मैदाम मारले. या स्पर्धेत ३६ जिल्हा आणि ६ महानगरपालिका असे ४२ संघ भिडले. या स्पर्धेत ३६ जिल्हा आणि ६ महानगरपालिका असे एकूण ४२ संघ सहभागी झाले होते. एका कुस्ती संघात गादी विभागातील १० आणि माती विभागातील १० असे एकूण २० कुस्तीगीर २ कुस्ती मार्गदर्शक आणि १ संघ व्यवस्थापक असे एकूण २३ जणांचा सहभाग होता. साधारण या कुस्ती स्पर्धेत ८४० कुस्तीगीर ८४ कुस्ती मार्गदर्शक आणि ४२ व्यवस्थापक, ८० पंच आणि ५० पदाधिकारी असे एकूण ११०० जणांचा सहभाग होता.अवघ्या साडे पाच सेकंदात ६६ व्या महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला कुस्तीच्या पंढरीत गंगावेस



तालमीत मेहनत घेणाऱ्या सिंकदर शेखने अवघ्या साडे पाच सेकंदात ६६ व्या महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला. अंतिम फेरीच्या लढतीत सिकंदरने प्रतिस्पर्धी शिवराज राक्षेला ५.३७ सेकंदाला झोळी डावावर चितपट केले. अंतिम फेरीच्या लढतीत सिकंदरचे पारडे निश्चित जड होते. पण, शिवराज त्याला आव्हान देईल अशी अपेक्षा होती. मात्र, वेगवान आणि आक्रमक कुस्ती खेळणाऱ्या सिकंदरपुढे शिवराजचा निभाव लागला नाही. लढतीला सुरुवात झाल्यावर अवघ्या काही सेकंदात सिकंदरने झोळी डाव घेत शिवराजला उचलून खाली घेतले आणि त्याच स्थितीत शिवराजला चितपट करून विजेतेपदाचा मान मिळविला.

# केसांना लावलेली मेहंदी तीन महिने टिकेल, फक्त भिजवताना ही पद्धत वापरा

सणासुदीच्या दिवसात जशी गोड- धोड पदार्थ अन् घरातल्या सामानाची खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. अगदी तशीच हेअर डाय, मेहंदीच्या पाकिटांचीही होतेच. हे डाय वापरण्याच महिला अन् पुरुष दोघेही आग्रही असतात. त्यामुळे प्रत्येक महिन्याच्या सामानाच्या यादीत हेअर डाय, मेहंदीही असतेच.कारण केसांच्या पिकण्याचे, पांढरे होण्याचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. पिकलेले केस जगाच्या लाजेने का होईना पण लपवावेच लागतात. अन् त्यासाठी मेहंदीचा वापर करावा लागतो.हेअर डायचा रंग महिनाभरातच उतरतो त्यामुळे प्रत्येक महिन्याला ते लावावेच लागतात. मेहंदी नॅचरल असली तरी तिचीही सेमच कंडिशन असते. तुम्हीही पिकलेल्या केसांना सतत मेहंदी लावून कंटाळला असाल तर एक ट्रिक आहे. जी तुम्हाला मदत करेल.तुम्ही मेहंदी लावत असाल तर ती कशी भिजवायची याची एक ट्रिक पाहुयात. जिचा वापर केलात तर तुम्हाला तीन महिने तरी केसांकडे पहावे लागणार नाही.मेहंदी अशी भिजवा वेगळ्या पद्धतीने मेहंदी भिजवण्यासाठी तुम्हाला चहापूडीचे पाणी, १ चमचा हळद, सव्वा चमचा मेथी पावडर, १ चमचा मोहरीचे तेल या वस्तू लागतील.मेहंदी पावडर एका लोखंडी कढईत काढून घ्या. त्यानंतर यात हळद, मेथी पावडर, मोहरीचे तेल घाला. मिश्रण एकजीव करून त्यामध्ये लागेल तसे चहाचे पाणी घाला.२४ तास ठेवणे हे मिश्रण लगेचच लावू नका. तर ते झाकून २४ तास लोखंडाच्या कढईत ठेवा. लोखंडामुळे मेहंदीचा रंग अधिकच खुलतो.

# सोनपापडीच नव्हे, मिठाईचा बॉक्सच टाळा! त्याच किंमतीत प्रियजनांना गिफ्ट करा खास गॅजेट्स

दिवाळी सणाला लोक एकमेकांना भेटवस्तू देतात. यामध्ये सर्वात जास्त वाटा हा मिठाईंच्या बॉक्सचा असतो. त्यातल्या त्यात कित्येक जण सोनपापडीचा बॉक्स म्हटलं की तोंड वाकडं करतात. यामुळेच तुम्ही जर कोणाला गिफ्ट देण्याचा विचार करत असाल, तर मिठाईचा बॉक्स हा पर्यायच रद्द करणं उत्तम. त्याऐवजी तुम्ही तेवढ्याच किंमतीत चांगले गॅजेट्स इतरांना गिफ्ट करू शकता.इअर बड्स वायरलेस हेडफोन्समध्ये इअर बड्स हा सध्या सर्वात जास्त फेमस असणारा प्रकार आहे. बेसिक इअर बड्स तुम्हाला ऑनलाईन शॉपिंग वेबसाईट्सवर आरामात मिळू शकतात. साधारणपणे ७०० ते १,००० रुपये किंमतीत चांगले बड्स मिळू शकतात. ब्लूटूथ स्पीकर गाणी ऐकण्याची आवड बहुतांश लोकांना असते. या दिवाळीला तुम्ही एखाद्या व्यक्तीला ब्लूटूथ स्पीकर गिफ्ट म्हणून देऊ शकता. झेब्रॉनिक्स, मिव्ही, अमेझॉन बेसिक्स अशा कंपन्यांचे ब्लूटूथ स्पीकर साधारणपणे ५०० ते ७०० रुपयांच्या रेंजमध्ये मिळू शकतात.स्मार्टवॉच




आपल्या आसपास कित्येक हेल्थ कॉन्शिअस लोक असतात. त्यांना गिफ्ट म्हणून मिठाईचा बॉक्स देण्याऐवजी एखादं स्मार्टवॉच तुम्ही गिफ्ट करू शकता. अर्थात, यासाठी तुम्हाला तुमचं बजेच १,००० रुपयांपेक्षा जास्तच ठेवावं लागेल. साधारणपणे २,००० रुपयांपेक्षा कमी किमतीत तुम्हाला चांगली स्मार्टवॉच मिळू शकेल.ड्रायफ्रूट्स मिठाईच्या किंमतीमध्येच तुम्ही हेल्दी गिफ्ट देखील देऊ शकता. कित्येक दुकानांमध्ये छान पॅक केलेले ड्रायफ्रूट्सचे कॉम्बो देखील मिळतात. असे गिफ्ट दिल्यास ते नावाचं स्टिकर बदलून पुढे पाठवले जाण्याची शक्यता कमी होते.


# फराळात हा एक पदार्थ बनवा, मुलं चिप्स, कुरकुरे खाणं विसरतील

आजकालच्या मुलांना फास्ट फुडपेक्षाही अधिक प्रिय आहेत स्नॅक्स आणि नमकिन. त्यातही कुरकुरे अन् चिप्स म्हणजे त्यांचा जीव की प्राण. पण सतत असे मसालेदार अन् मीठ असलेले पदार्थ मुलांच्या आरोग्यासाठी बाधक असतात.८०-९० च्या दशकात जन्मलेली अनेक मुलं फराळाची वाट बघत बसायचे. आई घरी फराळ कधी बनवणार असेही ते विचारायचेत. पण आज याच्या उलट परिस्थिती आहे. मुलांना फराळ खावासा वाटत नाही. याउलट चिप्स अन् बाकीच्या वस्तू ते आवडीने खातात. मुलांची ही सवय बंद करायला दिवाळीचा फराळच मदत करेल. कसे ते पाहुयात.दिवाळीच्या फराळात शंकरपाळी हा असा पदार्थ आहे जो थोडा का होईना करावाच लागतो. पण, त्यातही आता खारी शंकरपाळी लोकांच्या पसंतीस पडली आहे. तुम्ही यापैकीच एक प्रकार असलेला पदार्थ आज आपण बनवुयात. साहीत्य मैदा २ कप पिठी साखर मीठ लाल तिखट जिरे ओवा गरम तेलाचे मोहन कृती दोन वाटी मैदा घेऊन एकसारखा करून घ्यावा. या पिठात सर्व मसाले एकजीव करा. मसाले मिक्स झाले की त्यात तेलाचे मोहन टाका.त्यानंतर लागेल त्या प्रमाणात पाणी शिंपडून घट्ट पिठ भिजवा. पिठाचा गोळा तयार झाल्यानंतर अर्धी वाटी तेल घेऊन पुन्हा पिठ चांगले मरदून घ्या.आता या पिठाचे मध्यम आकाराचे गोळे करून त्याची पातळ चपाती लाटून घ्या. यानंतर त्याचे पिझ्झा कट करतो तसे त्रिकोणी काप करून घ्या. या प्रत्येक कापाचे रोल बणवून घ्या.

# बजेटवाली दिवाळी, प्लास्टिक कचऱ्यापासून अशा पद्धतीने घरीच बनवा रांगोळीचे साचे

उळुरश्रळ २०२३ : दर दिवाळीला रांगोळीचे साचे आणले अन् तू नेहमी ते खराब करतोस, असं आजी तिच्या दोन वर्षाच्या नातवाला म्हणत होती. कारण, तोही आईसारखी रांगोळी काढायची म्हणून मागे लागतो अन् साच्यात रांगोळी भरून ती घरभर विस्कटतो.

केवळ रांगोळीच नाहीतर ते साचेही कुठेही फेकून देतो. त्यामुळे प्रत्येकवेळी रांगोळी काढायची म्हटलं की गैरसोय होते. तुमच्या घरीही गेल्यावर्षीचे साचे सापडत नसतील तर या काही आयडीया वापरून तुम्ही घरीच रांगोळीचे साचे बनवू शकता. कसे ते पाहुयात.रांगोळी स्पर्धेमध्ये राहुल चव्हाणचे यश रिकाम्या बाटल्या आपल्या घरात पाण्याच्या अनेक रिकाम्या प्लास्टीकच्या बाटल्या असतात. त्यांचा पुर्नवापर करून तुम्ही रांगोळीचा पेन बनवू शकता. यासाठी बाटलीच्या झाकणाला एक




होल पाडावं लागेल. त्यानंतर त्यात रांगोळी भरून त्याचा वापर करू शकता.तेल, फेसवॉशच्या बाटल्या तुम्ही पॅराशूट अन् फेसवॉशच्या बाटल्यांचा वापरही करू शकता. या बाटल्या स्वच्छ धुवून सुकवून घ्या. त्यानंतर त्यात रांगोळी भरून तुम्ही त्यानेही रांगोळी काढू शकता. तुटलेली चाळण, गाळणं आपल्या घरात अडगळीच्या खोलीत तुटलेली चाळण असतेच. त्या चाळणीचे कापड काढून तुम्ही प्लास्टिकच्या ग्लासला गुंडाळू शकता. यासाठी रबरचा वापर करू शकता. प्लास्टिकच्या छोट्या ग्लासला ही जाळीदार चाळण फिट करा आणि ग्लासमध्ये रांगोळी भरून तीचा वापर करा.स्टिक आणि झाकण संस्कारभारती रांगोळी काढायची असेल तर ठिपक्यांचा वापर करू शकता. ठिपके एकसारखे यावेत म्हणून आयस्क्रिमची स्टिक घ्या. त्याला एका सॉसच्या बाटलीचे टोपण लावून त्याने तुम्ही एकसारखे ठिपके पाडू शकता.

# विधवा महिला शिक्षिकेला व्यापारी दाम्पत्याकडून बॅटने अमानुषपणे मारहाण, पोलिसात गुन्हा दाखल

लातूर : शहरातील मंत्री नगर इथे राहणाऱ्या एका विधवा महिला शिक्षिकेला येथील व्यापारी गोपाल दरक आणि त्याची पत्नी सपना गोपाल दरक यांनी बॅटने अमानुषपणे बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. ज्यात महिला शिक्षिकेचा हात फ्रॅक्चर झाला आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात व्यापारी दरक दाम्पत्याविरोधात भा.दं.वि.च्या विविध कलमानव्ये गुन्हा दाखल करण्यात आलाय.




लातूर शहरातील मंत्री नगर इथे राहणाऱ्या श्रीमती संगीता राजकुमार भोसले (वय–५३) या महिला शिक्षिका नेहमी प्रमाणे मॉर्निंग वॉकला निघाला होत्या. मात्र घरापासून काही अंतरावर असलेल्या श्रीनिवास नगर येथे राहणारा व्यापारी गोपाल दरक आणि त्याची पत्नी सौ.सपना गोपाल दरक यांनी त्यांना अडवले. तसेच तुम्ही आमच्या घराजवळ लघुशंका केल्याचा संशय व्यक्त करीत दरक दाम्पत्याने महिला शिक्षिकेला बॅटने अमानुषपणे बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. ज्यात महिलेचा उजव्या मांडीवर, पिंडरीवर तसेच डाव्या हातावर जबर जखमा झाल्या असून शिक्षिकेचा हात फ्रॅक्चर झाला आहे. ही मारहाण रोखण्याचा प्रयत्न करणारा शिक्षिकेचा मुलगा शुभम भोसले यालाही या व्यापारी दाम्पत्याने बॅटने मारहाण केल्याचे पोलिसात दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. इतर कोणत्यातरी महिलेवर असणाऱ्या रागातून आणि संशयातून, दरक दाम्पत्याने विनाकारण तब्बल अर्धा तास आपणास अमानुषपणे मारहाण करीत होते असे जखमी विधवा शिक्षिका भोसले यांनी म्हटले आहे.

याप्रकरणी लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमानुषपणे मारहाण करणारे आरोपी व्यापारी गोपाल दरक, त्याची पत्नी सपना गोपाल दरक यांच्याविरोधात भा.दं.वि.च्या कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# फटाकड्यांचा खर्च कमी करून सहाशे झाडांची लागवड केली. ग्रीन लातूर वृक्ष टीम व युवा माहेश्वरी लातूरचा उपक्रम.




फटाखे वाजवू नका म्हटलं की लोकांना राग यायला लागतो, प्रदूषण, पर्यावरण, निसर्ग याबद्दल काही घेणे देणे नसणाऱ्या लोकांकडून विवीध धर्माचें सणांची नावे काढूण ट्रोल केले जाते. कितीही समजावून सांगितले तर कळत नाही. म्हणुन यातील मधला मार्ग काढून निसर्गाची काळजी घेउन दिवाळी साजरी करण्याची एक नविन कल्पना समोर आली.


जेव्हा हा प्रस्ताव मांडला, सर्वांना सूचना आवडली, तात्काळ तयारी सुरु झाली, प्रत्येकी २००रू जमा करुन दहा हजार रुपयेची झाडे व झाडांसाठी पाणी टँकरची सोय करण्यात आली. नियोजनानुसार आज पी. व्ही.आर. चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय पर्यंत जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान समोरील दुभाजक स्वच्छ करुन दुभाजकात ६०० खड्डे खोदून, ६०० फुलझाडे लावली. सर्व झाडांना भरपूर पाणी दिलं. एकमत ऑफिस समोरील बदामांच्या झाडांना भरपूर पाणी दिलं. ग्रीन लातूर वृक्ष टीम व युवा माहेश्वरी च्या सदस्यांनी श्रमदान करुन वृक्ष लागवड उपक्रम यशस्वीपने पुर्ण केला.

यावेळी लातूर जिल्ह्यातील प्रसिध्द श्वसन विकार तज्ञ डॉ. रमेश भराटे यांनी लातूरकरांनी पर्यावरणपूरक व प्रदुषणविरहित दिवाळी साजरी करावी असे आवाहन केले.

## सरस्वती संगीत परिवाराच्या वतीने ' भक्तिरंग ' दिवाळी पहाट व सत्संग मेळा

लातूर :–प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालय,मराठवाडा संगीत कला अकादमी, दत्त मंदिर संस्थान, औसा रोड, लातूर, रोटरी क्लब (मेन), डी.एस .परिवार,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ६:१५ वाजता दत्त मंदिर, औसा रोड,लातूर याठिकाणी भक्तीरंग 'दिवाळी पहाट' व 'सत्संग मेळा' या देखण्या कार्यक्रमाचे आयोजन केले असून सर्व लातूरकर संगीत रसिकांना ही दिवाळीची मेजवानी ठरणार आहे. या दिवाळी पहाट कार्यक्रमाप्रसंगी सुप्रसिद्ध युवा गायक श्री.आदित्य कडतने (सुवर्ण पदक विजेते) तसेच लातूर येथील स्थानिक कलावंत प्रा. लक्ष्मण श्रीमंगले,प्रा. शिवकुमार उरगुंडे ,प्रा. विश्वनाथ स्वामी,प्रा.गणेश बोरगावकर, प्रा अमर कडतने, प्रा.गोपाळ जाधव, श्री.देविकुमार पाठक, सौ.सुवर्णा कुंटे, सौ .सरोज बोरगांवकर,सौ.सुनीता शिंदे तसेच ज्येष्ठ गायक सुरमणी पं.बाबुराव बोरगांवकर इत्यादी नामांकित कलावंत आपली कला सादर करणार आहेत.

# पंतप्रधानांचं भाषण सुरु असताना तरुणीनं उचललं मोठं पाऊल; मोदींना कराव्या लागल्या विनवण्या





नवी दिल्ली– पंतप्रधान नरेंद्र मोदी तेलंगणमधील सिकंदरबादमध्ये निवडणूक प्रचारासाठी आले होते. यावेळी एक हैराण करणारं प्रकरणं पाहायला मिळालं. पंतप्रधान नरेंद्र मोदी सभेला संबोधित करत होते. यावेळी अचानक एक मुलगी लाईटिंगसाठी उभारण्यात आलेल्या एका पोलवर चढली. त्यामुळे खळबळ उडाली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोरच हा प्रकार घडल्याने त्यांनी तात्काळ याची दखल घेतली. मोदींनी या मुलीला खाली उतरण्याची विनंती केली. पण, मुलगी खाली उतरण्यास तयार नव्हती. तिला काहीतरी सांगायचं होतं. पंतप्रधान मोदी यावेळी मुलीला म्हणाले की, मी तुमच्यासाठी इथं आलो आहे. मी तुझं काय म्हणणं आहे ते ऐकूण घेईन. पण, बेटा, तू खाली उतर.पंतप्रधान मोदी यांच्यासह अन्य काही नेत्यांनीही मुलीला खाली उतरण्याची विनंती केली. पोलिस देखील सतर्क झाले होते. सर्वांकडून विनंती होत असल्याने आणि पंतप्रधान मोदी यांनी तिचे म्हणणे ऐकून घेण्याची तयारी दाखवल्यानंतर मुलगी पोलवरुन खाली उतरली. मुलगी खाली उतरल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी तिचे आभार मानले. दरम्यान, या प्रकारामुळे थोडावेळासाठी सभेमध्ये तणाव निर्माण झाला होता. सदर घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, तेलंगणमध्ये ३० नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. यापार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी जोर लावण्यास सुरुवात केली आहे. भाजपनेही राज्यात प्रचारसभांचा धडाका लावला आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोदींनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला.

## G20 Y20, CE नॅशनल होलिस्टिक समिट–२०२३ हे लातूरच्या तरुणांसाठी एक मोठे व्यासपिठ : आयोजक वैष्णवी आणि शिवानी येरटे.




लातूर / प्रतिनिधी : देशात ख्याती प्राप्त असलेल्या लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नमधील युवकांसाठी लातूर येथे आयोजित केलेला लातूरचा पहिला ग्लोबल प्रोजेक्ट जी–२० वाय–२० एसीई नॅशनल होलिस्टिक समिट हा कार्यक्रम लातूरच्या १२ ते २९ वयोगटातील जवळपास ३२०० विद्यार्थ्यांसाठी यश संपादन करुन देणारे एक मोठे व्यासपिठ ठरले असल्याचा विश्वास आयोजक वैष्णवी आणि शिवानी येरटे यांनी व्यक्त केला. या या दोन दिवसीय कार्यक्रमाचे उद्घाटन ८ नोव्हेंबर रोजी लातूर जिल्ह्याचे खा. शुधाकर शृंगारे व माजी खासदार गोपाळराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते.

जी–२०, वाय–२० एसीई नॅशनल होलिस्टिक समिट–२०२३ या नाविन्यपूर्ण अशा या कार्यक्रमासाठी लातूर येथील वेगवेगळ्या प्रकारच्या जवळपास २० संस्थांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांची बौध्दीक क्षमता आणि कौशल्य तपासणीसाठी विविध ८ बुद्धिमत्ता आधारित ३० खेळांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये भारतभरातील जवळपास ३० समुपदेशकांकडून प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक अशा समुपदेशकांकडून समुपदेशन करण्यात आले. त्याशिवाय यामध्ये गुणवत्ताधारक आणि कुशल विद्यार्थ्यांना जी– २०, वाय–२०, एसीईचे प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. नाविन्यपूर्ण अशा या कार्यक्रमाद्वारे १० विद्यार्थ्यांची दिल्ली येथील एका विशेष परिषदेसाठी निवड देखील आयोजकांकडून करण्यात आली.

तत्पूर्वी लातूर येथील तरुणांसाठी शैक्षणिक, संधी आणि माणसिक स्थरावरील मार्गदर्शनासाठी एक गट स्थापन करण्यात आला होता. त्याच गटा मार्फत ८ आणि ९ नोव्हेंबर या दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम खा. शुधाकर शृंगारे व माजी खासदार गोपाळराव पाटील माजी मंत्री तथा आ. संभाजी पाटील निलंगेकर, अभिषेक मेल्होत्रा, सचिव, भागीदारी आणि वित्त, जी–२० सचिवालय (दिल्ली) यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी , क्लासवाईज. आक्षा फाऊंडेशन, लातूर, वंडरवर्ल्ड, मोटेगावकर सरांचे आरसीसी क्लासेस, बिडवे इंजिनिअरींग कॉलेज, चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज, संस्कृती प्रतिष्ठाण, विद्याआरधना क्लासेस, बिल्डकॉर्न, आदीराज डेव्हलपर्स, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आदींचे प्रायोजकत्व लाभले होते.

# माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शाम नगर (१२ नंबर पाटी) नूतन ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून दिल्या शुभेच्छा



लातूर प्रतिनिधी शनीवार दि. ११ नोव्हेंबर २३ :

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची लातूर शहरा नजीक असलेल्या श्यामनगर (१२ नंबर पाटी) येथील नूतन सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी शनिवार दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी येऊन भेट घेतली, याप्रसंगी त्यांनी सर्वांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी गावातील विविध विकासकामांच्या संदर्भाने चर्चा केली. सर्वांना दिवाळीनिमित्तही शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शाम नगर (१२ नंबर पाटी) गावातील विविध विकास कामावर चर्चा करून सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नूतन सरपंच व्यंकट जाधव, उपसरपंच बरकत शेख, ग्रामपंचायत सदस्य चिंतामणी चौगुले, परमेश्वर पोटभरे, सौ. शांताबाई उपाडे, सौ. आशा आलापुरे, सौ. रेणुका गोटे, सौ. मीनाक्षी उपे, पृथ्वीराज कुरे यांच्यासह गावातील नागरिक अंगद उपाडे, मैनोदिन शेख, कृष्णा उपाडे, खय्युम शेख, राजोदिन शेख, गोविंद आलापुरे, फुलचंद जाधव, शौकत शेख, भागवत तिगीले, राजेंद्र उफाडे बळीराम उफाडे, अकबर शेख, श्याम उफाडे, बाळासाहेब पेटकर, सुनील पवार, नामदेव घनगावे, देविदास ढवारे, शबाना शेख, अर्जुन विटकर, यालापा गोटे, अरबाज शेख, मेहमूद शेख, तिमा जाधव, दिलीप चौगुले, अंगद कुंभार, सुनील पवार, गोविंद आलापुरे आदी उपस्थित होते.

# माझ्या केसाला जरी धक्का लागला तर; उद्धव ठाकरेंचा शिंदेना थेट इशारा

मुंबई : शिवसेनेच्या मुंब्र्यातील शाखेचा वाद काही केल्या कमी होताना दिसत नाही. अशातच उद्धव ठाकरे यांना शाखेपर्यंत जाण्यास पोलिसांनी रोखल्यानंतर माघारी परतलेल्या उद्धव ठाकरेंनी उपस्थित शिवसैनिकांना संबोधित केले. यावेळी उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीकेचे बाण सोडले. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मला सकाळीच कळाले की, त्यांनी आपली बॅनर्स फाडली, पण मी त्यांना सांगून इच्छितो की, आमची सत्ता येऊ द्या आम्ही तुमची मस्ती फाडू. पोलिसांचे आभार मानतो की, त्यांनी शाखा चोरांचे रक्षण केलं शाखेच्या मालकापासून. आज सगळा महाराष्ट्र पाहतो आहे की, प्रशासन किती हतबल झालेलं आहे. कारण आज जर येथे इकडे तिकडे काही झालं असतं तर महाराष्ट्राची अब्रू गेली असती. महाराष्ट्राची अब्रू या चोरांनी जे की, सत्ता भोगातायेत त्यांनी आधीच घालवली आहे. असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली.

यावेळी पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मी जेव्हा शाखा पाहणीसाठी जात होतो तेव्हा तुम्ही सगळे जण आगे बढो अशा घोषणा देत होता. आगे बढो हम तुम्हारे साथ है तर तुम्ही साथ देणार आहात का? जो लढा लढण्यासाठी आपण उतरलो आहोत तो लढा लढण्यासाठी तुम्हा साथ देणार आहात काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित समर्थक कार्यकर्त्यांना विचारला.

तो खोका उचला नाही तर.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मी प्रशासनाला सांगतोय की, या खोके सरकारने आमची शाखा पाडून तेथे खोका आणून ठेवला आहे. आमच्या जागेवर अतिक्रमण केले आहे. तेव्हा लवकरात लवकर तो खोका उचला नाही तर आम्ही तो खोका उचलून फेकून दिल्या शिवाय राहणार नाही. या शाखेचा वादच नाही,सगळी कागदपत्रे आमच्याकडे आहेत.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी आणि कामगारासोबत साजरी केली दिवाळी

लातूर –श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबरोबरच कामगारांसोबत संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक आणि कार्यालय प्रमुख यांनी दिवाळी साजरी केली.

यावेळी शफिक चांद शेख, मुख्तार चांद शेख, माऊली, अलीम, जमीर, गौरव, वसीम, रियाज, अझहर आणि आयाज यांचा प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना फराळाचे वाटप करण्यात आले.



या उपक्रमाबद्दल उपस्थित सर्व कामगारांनी संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक आणि कार्यालय प्रमुखाचे मनःपूर्वक आभार मानून सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

तसेच दि. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सामुहिक बैठक घेऊन त्यांना प्रशासनामार्फत हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

त्यानंतर दि. १० नोव्हेंबर २०२३ रोजी महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर अप्पा मल्लिकार्जुन अप्पा बिडवे आणि ज्येष्ठ संचालक ॲड. श्रीकांत अप्पा उटगे यांनी सर्वांना हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांच्या हस्ते फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संस्था पदाधिकारी व प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानून दिवाळीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE